नियमित दिवाणी दावा क्र. १६०/१९७९
**काशिनाथ विरुध्द माणकेश्वर व इतर**
**CNRNOMHSO170000021979**

## निशाणी क्र. २७२ वरील आदेश

वादीतर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

०२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ यांना जाहीर समन्स काढण्याबाबत वादी यांनी दाखल केला असून प्रस्तुत प्रकरणी मा.अपिलीय न्यायालय यांचे आदेशानुसार (फेर संपरिक्षा घेण्याचे आदेश झाल्यानंतर) सदर प्रकरणी त्यांना बजावणी झालेली नव्हती. या प्रकरणामधील मुळ प्रकरणी बजावणी होवून त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश पारित करण्यात आला होता. या प्रकरणी त्यांना नोटीस पाठविली असता सदर प्रतिवादी क्र. ४ हे सदरचा पत्ता २० वर्षापुर्वी सोडल्याबाबत लघुवाद न्यायालय, मुंबई येथील बेलिफाचे दि.२८/११/२०२५ रोजीच्या अहवालावरुन दिसून येते. सदर बाब पाहता, प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी यांना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम २० प्रमाणे समन्स बजावणी करणे योग्य होणार आहे. सबब, आदेश.

### आदेश.

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | प्रस्तुत प्रकरणी **प्रतिवादी क्र. ४–उषा एकनाथ कुलकर्णी** यांना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम २० प्रमाणे जाहीर समन्स काढण्यात यावे. |
| ३. | सदर समन्स बजावणी दैनिक सामना मध्ये प्रसिध्द करण्याकरिता परवानगी देण्यात येते. |

LAMBE PRATIK GANESH
Digitally signed by LAMBE PRATIK GANESH
Date: 2026.02.03 11:09:03 +0530

( प्रतिक गणेश लंबे )
सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, माढा.

दिनांक : ०२/०२/२०२६.